सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन, गृह विभाग

फोन क्र. : (०२०) २६१२३५६३
फॅक्स क्र. : (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.est1-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

जाक्र.इएसटी/लिपिक व लिपिक रिक्त पदेभरती/२०२३-२४/ 10794 /कक्ष १(३) पुणे दिनांक २६.१२.२०२४

## // उमेदवारांना सूचना//

**विषय :-** कारागृह विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या प्रतिक्षा यादीतील निवड करण्यात उमेदवारांचे दस्तऐवज पडताळणीबाबत.

कारागृह विभाग सरळसेवा लिपिक - वरिष्ठ लिपिक पदभरती-२०२३-२४ अंतर्गत दिनांक १९.३.२०२४ ते २१.३.२०२४ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणांनुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेवून लिपिक एकुण १२५ पदांची प्रवर्गनिहाय निवडसूची कारागृह विभागाचे www.mahaprisons.gov. in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती त्यानुसार सदर उमेदवारांची मुळ कागदपत्र तपासणी करण्यात आली मात्र त्यापैकी जे उमेदवार गैरहजर होते व जे मुळ कागदपत्र तपासणीमध्ये अपात्र झाले आहेत व जे उमेदवार येण्यास इच्छुक नाहीत त्यांची निवड रद्द करण्यात आली असून त्याऐवजी प्रतिक्षायादीतील व गुणवत्तायादीतील उमेदवारांची प्रवर्गनिहाय निवड मुळ दस्तऐवज पडताळणी, वैद्यकिय तपासणी व पूर्वचारित्र्य पडताळणीचे अधीन राहून करण्यात आली आहे करण्यात आली आहे. त्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

कारागृह विभागाचे लिपिक पदाचे निवडयादीत नमुद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, समांतर आरक्षण संबंधी पूरावा व इतर सर्व दस्तऐवज यांची मुळ कागदपत्रे व त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिधी चालनार नाही) दस्तऐवज पडताळणीकरिता खालील नमुद ठिकाणी व वेळी समक्ष उपस्थित रहावे.

| संवर्ग | दस्तऐवज पडताळणी दिनांक व वेळ | उमेदवार संख्या | स्थळ |
|---|---|---|---|
| लिपिक | दि. २.१.२०२५ सकाळी १०.३० वाजता | क्र १ ते ५५ | अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय, जूनी मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१ |

मुळ दस्तऐवज तपासणीकरिता विहित प्रपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. सदर प्रपत्रातील सर्व माहिती अचुकपणे नमुद करण्यात यावी. व त्यासोबत नमुद केलेली सर्व मुळ कागदपत्रे व स्वसाक्षांकित प्रतीसह सोबत आणावयाची आहेत.

उमेदवाराने आरक्षित जागेकरिता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठयर्थ आवश्यक असलेली मुळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच दस्तऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला पुरावा, स्वतःचे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

तसेच उपरोक्त नमुद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरिता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरून निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताळणीकरिता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहील.

**(मा अ पो मं स व कामनि यांचे मान्यतेने)**

(सत्यवान हिंगमिरे)
**वरिष्ठ प्रशासन अधिकारी**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे -०१